पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address:** SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

*दिनांक- २९/०१/२०२०*

## मौजा पेरिमिलीभट्टी जंगल परिसरात पोलीस नक्षल चकमकीत ०५ जहाल नक्षलवाद्यांना अटक

- अबुजमाड जंगल परिसराचा भाग समजल्या जाणाऱ्या परिसरात गडचिरोली पोलीस दलाला अभुतपूर्व यश.
- अटक नक्षलवाद्यांमध्ये ०२ नक्षली कुटुल नक्षल दलम सदस्य तर ०३ जनमिलीशीया म्हणुन कार्यरत .

उपविभाग भामरागड हद्दीत येणाऱ्या उप पोलीस स्टेशन लाहेरी पासुन अंदाजे ३५ किमी अंतरावर असलेल्या व छत्तीसगड राज्याला लागुन असलेल्या मौजा पेरिमिलीभट्टी जंगल परिसरात गडचिरोली पोलीस दलातील सी-६० चे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असतांना नक्षलवाद्यांनी पोलीसांना जीवे मारण्याच्या उद्देशाने पोलीसांच्या दिशेने गोळीबार केला असता स्वसंरक्षणार्थ व प्रत्युत्तरादाखल जवानांनी गोळीबार केला. यावेळी नक्षलवादी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळुन जाण्याच्या प्रयत्न करु लागले. सी-६० कमांडोनी नक्षलवाद्यांचा शौर्यपुर्ण पाठलाग केला असता ०५ जहाल नक्षलवाद्यांना पकडण्यात सी-६० जवानांना यश प्राप्त झाले.

अटक केलेल्या नक्षलवाद्यांमध्ये १) रैनु सोनु वड्डे वय २० वर्षे रा. पदमकोट ता. कोहकामेटा जि. नारायणपुर २) बंडु चुक्कु वड्डे वय २५ वर्षे रा. पदमकोट ता. कोहकामेटा जि. नारायणपुर ३) सुखराम सोमा उसेंडी वय ४० वर्षे रा. उसेवाडा ता. कोहकामेटा जि. नारायणपुर ४) दोघे इरपा उसेंडी वय ३० रा. उसेवाडा ता. कोहकामेटा जि. नारायणपुर, ५) केये सायबी वड्डे वय ४० वर्षे रा. पदमकोट ता. कोहकामेटा जि. नारायणपुर वरील सर्व राहणार छत्तीसगड अटक केलेल्या ०५ नक्षलवाद्यांमध्ये ०२ नक्षल कुटुल एरिया दलम सदस्य म्हणुन कार्यरत असुन ०३ नक्षल जनमिलीशीयांचा समावेश आहे. अटक नक्षलवाद्यांकडुन ०३ हत्यारे व मोठ्या प्रमाणात नक्षल साहित्य जप्त करण्यात आले आहे. अटक नक्षलवाद्यांविरोधात उप पोलीस स्टेशन लाहेरी येथे गुन्हा दाखल केला असुन पोलीस पुढील चौकशी करत आहेत.

मा. पोलीस अधिक्षक, श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी छत्तीसगड राज्याला लागुन असलेल्या व अबुजमाड परिसराचा भाग समजल्या जाणाऱ्या मौजा पेरिमिलीभट्टी जंगल परिसरात सी-६० जवानांनी केलेल्या शौर्यपूर्ण कामगिरीचे कौतुक केले आहे.

